**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (व. स्तर) गंगापूर यांच्या न्यायालयात**

**विषेश दिवाणी दावा क्र. ३३२ /२०२५**

**हारून दगडु शेख**

**विरुध्द**

**कय्युम जाफर शेख व इतर**

**दावा :-** कराराची पुर्तता करणे बाबत, खरेदीताच्या जाहीर ठरावाबाबत व निरंतरच्या मनाई हुकुमाबाबत.

**विषय :-** दिवाणी संहितेच्या ऑर्डर ७ रूल ११ (ड) प्रमाणे वादीचा दावा फेटाळण्यात यावा.

**महोदय,**

प्रतिवादी नं २ तर्फे खालील प्रमाणे नम्र निवेदन करत आहे.

१) असे की, वादीने प्रतिवादी विरुद्ध कराराची पुर्तता करणे बाबत, खरेदीताच्या जाहीर ठरावाबाबत व निरंतरच्या मनाई हुकुम मिळणे बाबत प्रस्तुत दावा दाखल केला आहे, मात्र वादी व प्रतिवादी नं १ यांच्यात झालेला कथाकथीत (ताबे इसार पावती करारनामा ) हा पूर्ण स्टॅम्प शुल्क न भरता केलेला असल्याने तो कायदेशीर मनोग्राह्य धरल्या जाऊ शकत नाही व सदर करारनामा हा स्टॅम्प ॲक्ट कलम ३५ चा

भंग करत असल्याने वादीचा दावा हा दिवाणी संहितेच्या ऑर्डर ७ रूल ११ (ड) प्रमाणे फेटाळण्यात यावा.

२) असे की, वादीने प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी नं १ ने प्रतिवादी नं २ च्या हक्कात करून दिलेले खरेदीखत क्र ४०७४/२०२४ दि. ०३/०७/२०२४ हा बेकायदेशीर असल्याचे व वादीवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करून मागीतलेले असल्याने वादीने प्रस्तुत खरेदीखताच्या मुल्यांकनावर म्हणजेच ५,९५ ,०००/- रुपयांवर देखील कोर्ट फीस देणे आवश्यक होते मात्र वादीने प्रस्तुत दाव्यात जाहीर ठरावाचे मुल्यांकन १०००/- रुपये ठरवून त्यावर २०० /- रुपये कोर्ट फीस दिलेली आहे ती चुकीची व अपूर्ण असल्या कारणाने व त्यामुळे महाराष्ट्र कोर्ट फीस ॲक्ट कलम ६ चा भंग होत असल्याने वादीचा दावा हा दिवाणी संहितेच्या ऑर्डर ७ रूल ११ (ड) प्रमाणे फेटाळण्यात यावा.

३) असे की, वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये तहसीलदार गंगापूर, दुय्यम निबंधक गंगापूर,तलाठी सजा घोडेगाव तसेच मंडळ अधिकारी विभाग घोडेगाव यांना दाव्यामध्ये आवश्यक पार्टी म्हणून समाविष्ठ केले आहे. मात्र वादीने दाव्यामध्ये ऑर्डर २७ रूल ५ (अ) प्रमाणे सरकारला सदर दाव्यात पार्टी करणे आवश्यक होते मात्र वादी यांनी सरकारला प्रस्तुत दाव्यामध्ये पार्टी केलेले नसल्यामुळे वादीने ऑर्डर २७ रूल ५ (अ) चा भंग केला आहे म्हणून वादीचा दावा हा दिवाणी संहितेच्या ऑर्डर ७ रूल ११ (ड) प्रमाणे फेटाळण्यात यावा ही नम्र विनंती.

**<u>तरी विनंती की,</u>**

वादीचा दावा हा दिवाणी संहितेच्या ऑर्डर ७ रूल ११ (ड) प्रमाणे फेटाळण्यात यावा ही नम्र विनंती.

**दिनांक :- २५/०८/२०२५**

**तर्फे** **प्रतिवादी क्र २**

मंगलबाई

**ॲड. डी.ई. पानकडे** **मंगलबाई रघुनाथ लेंभे**

## <u>प्रतीज्ञालेख</u>

मी प्रतिज्ञक, मगलबाई रघूनाथ लेंभे, वयः ६० वर्षे धंदाः शेती रा. बोरगांव, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर शपथेवर निवेदन करती की, प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र १ ते परिच्छेद क्र ३ संपुर्ण मजकूर माझ्या माहिती व ज्ञाना प्रमाणे खरा व बरोबर असुन तो मला मान्य व कबुल आहे. करिता आज दिनांक २५/०८/२०२५ रोजी गंगापूर मुक्कामी प्रमाणित कला.

**प्रतिज्ञक**

मंगलबाई

**मंगलबाई रघुनाथ लेंभे**

Order
25-08-2025
O.S. to Say.
Sd/-
I/c. C.J.S.D.,
Gangapur.

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (व. स्तर) गंगापूर यांच्या न्यायालयात**
**विषेश दिवाणी दावा क्र. ३३२ /२०२५**

**हारून दगडु शेख**

**विरुध्द**

**कय्युम जाफर शेख व इतर**

**दावा :-** कराराची पुर्तता करणे बाबत, खरेदीताच्या जाहीर ठरावाबाबत व निरंतरच्या मनाई हुकुमाबाबत.

**विषय :-** दिवाणी संहितेच्या ऑर्डर ७ रूल ११ (ड) प्रमाणे वादीचा दावा फेटाळण्यात यावा.

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी प्रतिज्ञक, मगलबाई रघुनाथ लेंभे, वयः ६० वर्षे धंदाः शेती रा. बोरगांव, ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर शपथवर निवेदन करता की,

असे की, अर्जातील परिच्छेद क्र १ व परिच्छेद क्र ३ मधील संपूर्ण मजकूर माझ्या माहीती व ज्ञानाप्रमाण खरा व बरोबर आहे. करिता हे प्रतिज्ञापत्र.

**दिनांक: २५/०८/२०२५**

**मी ओळखतो** **प्रतिज्ञक**

मंगल बाई

**ॲड. डी.ई. पानकडे** **मंगलबाई रघुनाथ लेंभे**

## <u>प्रतीज्ञालेख</u>

मी प्रतिज्ञक, मगलबाई रघूनाथ लेंभे, वयः ६० वर्षे धंदाः शेती रा. बोरगांव, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर शपथेवर निवेदन करती की, प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र १ व परिच्छेद क्र ३ संपुर्ण मजकूर माझ्या माहिती व ज्ञाना प्रमाणे खरा व बरोबर असुन तो मला मान्य व कबुल आहे. करिता आज दिनांक २५/०८/२०२५ रोजी गंगापूर मुक्कामी प्रमाणित कला.

**प्रतिज्ञक**

मंगलबाई

**मंगलबाई रघुनाथ लेंभे**